**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित**
**ग्राहक तक्रार निवारण मंच**
**कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर**

सं.क्र.काअ/ग्रातनिमं/कोप/केस क्र. ०६/२०१६-१७/६९ दिनांक:२९-०६-२०१६

**आदेश**

**आदेश केस क्र. ०६/२०१६-२०१७**

श्री बाळकृष्ण भिकू पाटील,
मु. पो. राजापूर ता. तासगांव, अर्जदार
जिल्हा सांगली.

विरूध्द

१) कार्यकारी अभियंता (का) तथा नोडल ऑफीसर,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
मंडल कार्यालय, सांगली

२) कार्यकारी अभियंता, पक्षकार
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
विभागीय कार्यालय, सांगली ग्रामिण.

३) उपकार्यकारी अभियंता / अति. कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
उपविभागीय कार्यालय, तासगांव-१

**कोरमः-** १. श्री. पी.व्ही.खपली, सदस्य सचिव,
२. श्री. पी. एस. बुरांडे, ग्राहक सदस्य,

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

**न्याय निर्णय**

मी श्री. पी.व्ही.खपली, सदस्य सचिव ग्राहक तक्रार निवारण मंच, कोल्हापूर परिमंडळ खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहे.

आज दि. २५.०५.२०१६ रोजी केस क्र.०६ २०१६-१७ या केसची सुनावणी पार पडली. ग्राहक श्री बाळकृष्ण भिकू पाटील मु.पो. राजापूर, ता. तासगांव, जि. सांगली यांचे वतीने श्री. एच.डी. खापरे ग्राहक प्रतिनिधी म्हणून उपस्थीत होते. वि. प. महावितरण तर्फे श्री. श्रीकांत पाटील कार्यकारी अभियंता, श्री. जितेंद्र कांबळे उप कार्यकारी अभियंता तासगांव-१, श्री. गवळी कनिष्ठ अभियंता तासगांव-१ हे हजर होते.

## ग्राहकांची मागणी आणि तक्रारीचे स्वरुप

ग्राहक श्री बाळकृष्ण भिकू पाटील मु.पो. राजापूर, ता. तासगांव, जि. सांगली यांनी गट क्र ५६४ मध्ये ५ अश्वशक्ती शेतीपंपासाठी चलन रू. ६१००/- हे पावती क्र.८६७००१ दि. २०.१०.१४ या प्रमाणे भरले आहेत. अद्याप ग्राहकाला वीज जोडणी न मिळाल्यामुळे त्यांनी अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली यांचेकडे ०१.०१.२०१६ रोजी तक्रार दाखल केली आहे. सांगली कक्षाने दि. २६.०२.१६ आदेश क्र. १८९० नुसार प्रथम येणा-यास प्रथम प्राधान्य या तत्वा प्रमाणे जेष्ठता यादी नुसार विद्युत पुरवठा केला जाईल अशा त-हेचा आदेश दिला आहे. ग्राहकास तो मान्य नसल्यामुळे त्यांनी परिशिष्ठ अ नुसार मंचाकडे अर्ज केला आहे.

१. ग्राहकाने आपणास कृतीमानके विनिमयानुसार त्वरित वीज जोडणी दयावी.
२. जेष्ठता यादी ही संकल्पना कायदेशीर नाही तसेच जर नियमानुसार वेळेत पुरवठा होत नसेल तर मला कृतीमानके २०१४ नुसार भरपाई मिळावी आणी तो अर्ज कोणाकडे दयावयाचा याचे मार्गदर्शन करावे अशी मागणी केली आहे. तसेच वीज पुरवठा देताना Standard method of construction या प्रमाणे पुरवठा देण्याचा आदेश व्हावा अशी विनंती केली आहे. या सोबत त्यांनी आवश्यक माहिती जोडली आहे.

## वि. प. महावितरणचे निवेदन आणि चर्चा

वि. प. तर्फे दि. ०४.०५.१६ रोजी मंचास उत्तर सादर केले आहे. त्यामध्ये त्यांनी जेष्ठता यादी नुसार श्री. बाळकृष्ण भिकू पाटील यांचा नंबर ९८१ आहे असा उल्लेख केलेला आहे. तसेच प्रस्तावीत ५६४ गट नंबर हा सर्वे उप विभाग तासगांव-२ यांच्या अंतर्गत रोहीत्रावरून करणेत आला होता. तथापि Energy Audit नुसारआता हा तासगांव-१ अंतर्गत येणा-या रोहीत्रावरून करणेत येत आहे. त्यामुळे पूर्वी ०.०६ कि.मी. एवढी लघुदाब वाहीनीची गरज होती परंतु सदया ०.३ कि.मी. लघुदाब वाहीनी आवश्यक आहे. आणि श्री बाळकृष्ण भिकू पाटील यांचे connection नैसर्गिक न्याय या तत्वानुसार प्रलंबीत आहे असे उत्तर दिले आहे. या पत्राची प्रत ग्राहकास देण्यात आलेली नाही याची नोंद मंचाने घेतली आहे. महावितरण तर्फे तोंडी निवेदनामध्ये मार्च २०१३ पर्यंत Work Order पूर्ण झाल्या आहेत. एप्रिल १३ च्या पुढे तरतुद नाही. सबब आम्ही वीज जोडणी देऊ शकलेलो नाही असे कथन करण्यात आले. यावर ग्राहक प्रतिनिधींनी आम्हास त्वरित वीज जोडणी दयावी आणि महावितरणच्या काही अडचणी असतील तर त्यांनी योग्य त्या ठिकाणी त्याचा पाठपुरावा करावा, ग्राहकाला त्याचा त्रास होऊ देवू नये असे सांगीतले. मंचासमोर विनंती करताणा ग्राहक प्रतिनिधींनी असे कथन केले की कृतीमानके नुसार मला त्वरीत वीज पुरवठा झाल्यास आम्ही भरपाईची मागणी सोडून देण्यास तयार आहोत.

वरील सर्व चर्चा विचारात घेता खालील मुद्दे उपस्थित होतात.

१. ग्राहकाची मागणी करता येईल काय ?

उत्तर :- होय.

२. आदेश

उत्तर :- अंतिम आदेशा प्रमाणे.

## कारणमिमांसा

ग्राहक श्री बाळकृष्ण भिकू पाटील यांनी महावितरणकडे वीज जोडणी मिळण्यासाठी २०.१०.१६ रोजी पैसे भरलेले आहेत त्यामुळे ग्राहक नियमाप्रमाणे त्वरित वीज जोडणी मिळण्यास पात्र आहेत. वि. प. तर्फे जो नैसर्गिक न्याय आणि सेवा जेष्ठता यादी हा दिलेला पर्याय ग्राहकावर अन्याय करणारा आणि नियमाचे उल्लंघन करणारा आहे असे मंचाचे स्पष्ट मत आहे. विद्युत वितरण कायदा २००३ आणि महाराष्ट्र राज्य वीज नियामक आयोग (विद्युत पुरवठा संहिता पुरवठयाच्या इतर अटी) विनीमय ५ कलम ४.४ नुसार ग्राहकास Standard method of construction या नुसार त्वरित वीज पुरवठा करण्यात यावा असे हा मंच सुचित करीत आहे. निश्चित कालावधीत वीज पुरवठा व्हावा. ही ग्राहकाची मगणी लक्षात घेता भरपाईचा मुद्दा विचारात घेऊनये असे हा मंच सुचित करीत आहे.

## आदेश

१. ग्राहकास त्वरित विज जोडणी देणेत यावी.

२. सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

३. या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स,बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल.

सही/-
(पी.व्ही. खपली)
सदस्य सचिव

अध्यक्ष पद दिनांक १६-१२-२०१४ पासून रिक्त.

सही/-
श्री. पी. एस. बुरांडे,
ग्राहक सदस्य

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

MAHADISCOM
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित**
**ग्राहक तक्रार निवारण मंच**
**कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर**

सं.क्र.काअ/ग्रातनिमं/कोप/केस क्र. ०६/२०१६-१७/८०    दिनांक: १२-०७-२०१६

**<u>सुधारित आदेश</u>**
**<u>आदेश केस क्र. ०६/२०१६-२०१७</u>**

श्री बाळकृष्ण भिकू पाटील,
मु. पो. राजापूर ता. तासगांव,    अर्जदार
जिल्हा सांगली.

विरूध्द

१) कार्यकारी अभियंता (का) तथा नोडल ऑफीसर,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
मंडल कार्यालय, सांगली

२) कार्यकारी अभियंता,    पक्षकार
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
विभागीय कार्यालय, सांगली ग्रामिण.

३) उपकार्यकारी अभियंता / अति. कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
उपविभागीय कार्यालय, तासगांव-१

या कार्यालयाचा आदेश क्र. काअ/ग्रातनिमं/कोप/केस क्र.०६ /२०१६-१७/६९ दिनांक २९-०६-२०१६ च्याआदेशामध्ये पान क्रमांक ३ वरील **<u>कारणमिमांसा</u>** मधील महावितरणकडे वीज जोडणी मिळण्यासाठी २०-१०-२०१६ पैसे भरले आहेत. असे नमूद करण्यात आले आहे. त्याऐवजी **<u>महावितरणकडे वीज जोडणी मिळण्यासाठी दिनांक २०-१०-२०१४ असे वाचावे.</u>**

सही/-
(पी.व्ही. खपली)
सदस्य सचिव

सही/-
श्री. पी. एस. बुरांडे,
ग्राहक सदस्य